# पू. वामन गर्भात असल्यापासूनच त्यांच्या संतत्वाची झालेली ओळख

**‘बालक–संत कसे असतात ?’, याची ते गर्भाशयात येण्याआधीपासून जन्मानंतरच्या वर्षभराच्या काळात अभ्यास करण्याची संधी देणारे पू. (चि.) वामन अनिरुद्ध राजंदेकर !’ – परात्पर गुरु डॉ. आठवले**

‘चि. वामन याचा जन्म झाल्यावर ‘तो जन्मतः ७१ टक्के पातळीचा संत आहे’, असे मला जाणवले. असे असले, तरी मी ते घोषित केले नाही. याचे कारण असे होते की, साधकांना ते कळले की, ते वामनकडे निराळ्या दृष्टीने पहातील. मला तसे होऊ द्यायचे नव्हते. ‘साधकांना स्वतःला ते कळते का ? त्यांना काही अनुभूती येतात का ?’, हे मला अभ्यासायचे होते. प्रत्यक्षातही काही साधकांना ‘वामन दैवी बालक आहे’, हे ओळखता आले. एवढेच नव्हे, तर काही संतांसह काही साधकांनाही ‘तो संत आहे’, हेही ओळखता आले. हे कळल्यामुळे मला वामनला ‘संत’ म्हणून ओळखणाऱ्या साधकांचे कौतुक वाटले आणि त्यांना आलेल्या अनुभूती वाचून आनंद झाला.

‘महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया’च्या ज्योतिष फलित विशारद सौ. प्राजक्ता जोशी यांनीही ‘जन्माला येणारे बाळ ‘संत’ असेल’, असे आधीच सांगितले होते. यावरून ज्योतिषशास्त्राचेही महत्त्व लक्षात येते.

सौ. मानसी (पू. वामन यांची आई) राजंदेकर यांनी गर्भारपणाच्या काळात आणि पू. वामनच्या जन्मापासून आतापर्यंतच्या काळात अनेक बारकाव्यांनिशी वेळोवेळी केलेले लिखाणही अतिशय कौतुकास्पद आहे. त्यामुळे ‘पोटी संत जन्माला येणार असल्यास स्वतःत कोणते पालट होत जातात ? दैवी संकेत काय असतात ? देव कशा अनुभूती देतो ?’ इत्यादी गोष्टी लक्षात आल्या. ‘बाळाचे पाय पाळण्यात दिसतात’, ही म्हण प्रचलित आहे; पण हे अपूर्व दैवी बाळ गर्भाशयात येण्याआधी आणि आल्यानंतर त्याच्या दैवी लीलांचा प्रत्यय त्याच्या आईला, म्हणजे सौ. मानसी राजंदेकर यांना येत होता.

सर्वसाधारण बालकांपेक्षा दैवी बालकाला जन्माला घालणे आणि

त्याचे सर्व करणे, ही एक प्रकारे तपश्चर्याच असते. साधक असल्यामुळे पू. वामनच्या आई-वडिलांनी त्याचे सर्वकाही सहजतेने केले. पू. वामनच्या आईने लिहिलेल्या लेखात पू. वामनच्या जन्मापूर्वी आणि नंतर त्यांच्या घरी घरकाम करणाऱ्या वाईट शक्तींचा त्रास असलेल्या स्त्रियांना झालेले त्रास वाचून हे लक्षात येईल की, पू. वामनमध्ये किती चैतन्य आहे !

वामनचे आई-वडील सौ. मानसी आणि श्री. अनिरुद्ध साधना चांगल्या प्रकारे करत आहेत. यावरूनही 'संत कोणत्या कुटुंबात जन्माला येतात ?', हेही लक्षात येते. पू. वामनमुळे 'शुद्ध बिजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।', ही म्हण अनुभवता आली. असे अपूर्व दैवी बाळ जन्माला घातल्याबद्दल श्री. अनिरुद्ध आणि मानसी यांचे आभार मानावे तेवढे थोडे !'

**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले (१०.९.२०१९)** F (DW-SStBa-Va + PR 42Ch-SStBa-Va)

## विविध कथांद्वारे मुलांवर सुसंस्कार करणारा सनातनचा ग्रंथ !

### बोधकथा



बालपणी झालेल्या सुसंस्कारांमुळे मुलांचे जीवन आदर्श बनते. या ग्रंथातील विविध कथांमधून सदाचार, साधना, गुरुनिष्ठा, राष्ट्रभक्ती, धर्मप्रेम, संस्कृतीप्रेम आदींविषयी उत्तम आदर्श मुलांसमोर ठेवण्यात आले आहेत. या कथा वाचून मुलांचे केवळ मनोरंजन होणार नाही, तर आदर्श जीवन कसे जगावे, हेसुद्धा त्यांना कळेल. आपल्या मुला-मुलीला उद्याचा आदर्श नागरिक घडवू इच्छिणाऱ्या प्रत्येकाच्या घरात हा ग्रंथ अवश्य हवा !

## पू. वामन यांच्या संदर्भातील लिखाण करतांना त्यांच्या आई सौ. मानसी राजंदेकर यांच्या लक्षात आलेली सूत्रे

**१. पू. वामन यांचे लिखाण करतांना त्यांच्या आईला देवच सर्व सुचवत असून तोच सर्व लिखाण करवून घेत असल्याची अनुभूती येणे :** ‘मला पू. वामन यांचे लिखाण करण्यात पुष्कळ अडचणी आल्या, तरीही लिखाणासाठी बसल्यावर मला स्वतःचे अस्तित्व जाणवत नव्हते. ‘लिखाण किती वाजेपर्यंत होईल आणि किती पाने होतील ?’ हे देवच मला सुचवायचा आणि माझ्याकडून करवून घ्यायचा. पू. वामन यांच्याविषयीचे निरीक्षण आणि योग्य वाक्यरचना आपोआपच लिहिली जायची. पू. वामनही तेवढ्या वेळेनंतरच झोपून उठायचे. त्यामुळे मला लिखाणासाठी वेळ मिळायचा. केवळ गुरुकृपेने माझ्याकडून पू. वामन यांचे लिखाण पूर्ण झाले. मी सलग दोन रात्री ११.३० ते २.३० या वेळेत लिखाण केले. लिखाण करतांना ‘वामन माझे बाळ आहे’, असे मला जाणवत नव्हते आणि ‘त्याचा उल्लेख आदरार्थी करावा’, असे वाटत होते.

**२. ‘पू. वामन यांचे लिखाण करणे’ ही अशक्य गोष्ट असणे आणि ‘त्यांचे लिखाण पूर्ण होणे’, ही केवळ दैवी इच्छा असल्याची जाणीव होणे :** ‘परात्पर गुरु डॉक्टर, ‘पू. वामन यांचे लिखाण करणे’ माझ्यासाठी अशक्य गोष्ट आहे. पू. वामन यांचे निरीक्षण करण्याची अन् त्याचे संगोपन करण्याची माझी क्षमता नाही. ‘हे नारायणा, तुम्हीच माझ्याकडून हे सर्व करवून घेत आहात’, याची मला प्रत्येक श्वासाला जाणीव होते. ‘हे लिखाण पूर्ण होणे’, ही केवळ दैवी इच्छा आहे’, याचीही मला सतत जाणीव होती. मी केवळ निमित्तमात्र आहे. तुम्ही आम्हाला या दैवी बाळाचे पालक होण्याची संधी दिली आहे. ‘हे दायित्व तुम्हीच तुम्हाला अपेक्षित असे आमच्याकडून पूर्ण करून घ्यावे’, अशी आपल्या कोमल चरणी आर्त प्रार्थना आहे.’

**– सौ. मानसी राजंदेकर (पू. वामन यांची आई), पुणे (२३.७.२०१९)**

F (PR 42Ch-SStBa-Va)

# अनुक्रमणिका


१. साधनामय झालेल्या राजंदेकर परिवारात सनातनचे द्वितीय बालक-संत पू. वामन यांचा जन्म होणे, हे ईश्वरी नियोजन ! १७

२. सनातनच्या मार्गदर्शनाखाली साधना करत असलेले आणि पू. वामन यांचे वडील श्री. अनिरुद्ध अन् आई सौ. मानसी राजंदेकर ! १९

* परात्पर गुरु डॉक्टरांचा लाभलेला प्रत्यक्ष सत्संग आणि त्यांची शिकवण यांमुळे साधना करतांना, तसेच व्यावहारिक जीवन जगतांना गुरुकृपेचे छत्र अनुभवणारे श्री. अनिरुद्ध राजंदेकर ! १९

* विवाह, व्यवसाय आदी मायेतील गोष्टींकडेही साधनेच्या दृष्टीने पाहणाऱ्या आणि परात्पर गुरु डॉक्टरांवर नितांत श्रद्धा असलेल्या सौ. मानसी अनिरुद्ध राजंदेकर ! २७

३. सौ. मानसी राजंदेकर यांना गर्भधारणेपूर्वी आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती ४९

४. सौ. मानसी राजंदेकर यांना गर्भधारणेनंतर आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती ५१

५. बाळाच्या जन्मानंतर आधुनिक वैद्य, समाजातील व्यक्ती, कुटुंबीय, सनातनचे साधक आणि सनातनचे संत यांना जाणवलेली वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे, त्यांनी काढलेले कौतुकोद्गार आणि आलेल्या अनुभूती ७८



**सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !**

卐 मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे

卐 मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे

卐 ग्रंथांची संरचना ‘इन्डिझाईन’ या संगणकीय प्रणालीत करणे

या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा –

☎ (०८३२) २३१२३३४ किंवा ✉ granthgoa@gmail.com